जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्रमांक 02472-227301
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 14 ऑक्टोबर 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 27 ऑक्टोबर 2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 29 ऑक्टोबर 2020.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 02 नोव्हेंबर 2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 03 नोव्हेंबर 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 05/11/2020.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 30 नोव्हेंबर 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

ज्याअर्थी कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संदर्भ क्र. 6 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 7 अन्वये उस्मानाबाद लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 30 नोव्हेंबर 2020 पर्यंत वाढविला असून लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केलेला आहे. ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कन्टेन्मेंट झोन (Containment Zone) च्या बाहेरील क्षेत्रामध्ये ठाराविक उपक्रम/बाबी पुन्हा चालू करण्याबाबत संदर्भ क्र. 4 अन्वये पारित केलेल्या आदेशामध्ये दुरुस्ती व आदेशात नमूद बाबींचा समावेश करणेबाबत संदर्भ 8 अन्वये आदेश पारित केला आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून लॉकडाऊनच्या वाढविलेल्या कालावधीत महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 8 चे आदेशान्वये दिलेल्या **मार्गदर्शक**



Scanned by CamScanner

सूचना विचारात घेऊन संदर्भ क्र. 5 मध्ये नमूद या कार्यालयाचे आदेशान्वये जारी करण्यात आलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये दुरुस्ती व या आदेशात नमूद खालील बाबींचा समावेश करणेबाबत याद्वारे आदेश पारित करित आहे.

संदर्भ क्र. 5 मध्ये नमूद या कार्यालयाचे आदेश दि. 27 ऑक्टोबर 2020 चे परिशिष्ट 2 मधील मुद्दा क्र. 4 मध्ये उपमुद्दा क्र. (ix) नंतर खालील उपमुद्द्यांचा समावेश करण्यात येत आहे.

x. **सदर आदेशापासून जिल्ह्यातील कन्टेन्मेंट झोनच्या बाहेरील क्षेत्रात राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूं (जलतरणपटू) च्या प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणारे जलतरण तलाव चालू करण्यास परवानगी राहील.** याबाबत महाराष्ट्र शासनाचे क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय तसेच युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून जारी करण्यात येणा-या प्रमाणित कार्यपद्धती (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच सामाजिक अंतर व कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

xi. **सदर आदेशापासून जिल्ह्यातील कन्टेन्मेंट झोनच्या बाहेरील क्षेत्रात योगा प्रशिक्षण संस्था चालू करण्यास परवानगी राहील.** याबाबत महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून जारी करण्यात येणा-या प्रमाणित कार्यपद्धती (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच सामाजिक अंतर व कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

xii. **सदर आदेशापासून जिल्ह्यात शारिरीक अंतर व निर्जंतूकीकरणाचे उपाययोजनांचा अवलंब करुन सर्व बंदिस्त जागेतील क्रीडाप्रकार उदा. बॅडमिंटन (badminton), टेनिस (tennis), स्क्वॅश (squash), बंदिस्त जागेतील निशानेबाजी (indoor shooting ranges) इ. चालू करण्यास परवानगी राहील.** तसेच सामाजिक अंतर व कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

xiii. **सदर आदेशापासून जिल्ह्यातील कन्टेन्मेंट झोनच्या बाहेरील क्षेत्रात सिनेमा हॉल / चित्रपटगृहे / मल्टीप्लेक्स / नाट्यगृहे त्यांच्या आसनक्षमतेच्या 50 % क्षमतेने चालू करण्यास परवानगी राहील. सिनेमा हॉल / चित्रपटगृहे / मल्टीप्लेक्स / नाट्यगृहे यामध्ये कोणत्याही खाद्यपदार्थांना परवानगी असणार नाही. संस्था चालू करण्यास परवानगी राहील.** याबाबत महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य विभाग आणि स्थानिक प्राधिकरण तसेच माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून जारी करण्यात येणा-या प्रमाणित कार्यपद्धती (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच सामाजिक अंतर व कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक .11.2020 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(कौस्तुभ दिवेगावकर)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.



Scanned by CamScanner

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. विभागीय व्यवस्थापक, मध्य रेल्वे, सोलापूर.
4. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
6. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
8. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
9. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
13. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
14. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
16. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
17. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner